Indian Streams Rereach Journal
Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4 प्रा. डॉ. विकास ज. पवार ISSN:-2230-7850

Research Papers

# "औंध (पुणे शहर) परिसरातील अंगणवाडयांचा अभ्यास"

प्रा. डॉ. विकास ज. पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सी.के. गोयल महाविद्यालय,
दापोडी, पुणे - १२

**प्रस्तावना :–**

देशात सदृढ बालके जन्माला येणे हे एक आर्थिक विकासातील महत्वाचा घटक मानला जातो. परंतू भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये बहुतांश बालके कुपोषित व कमी वजनाची आढळतात. भारतांमध्ये बलामृत्युचे प्रमाण सर्वाधिक आहे. बालमृत्युचे एक महत्वाचे कारण म्हणजे कुपोषण होय. दारिद्रयामुळे माताच कुपोषित असते म्हणुन बालकही जन्मतःच कुपोषित जन्मते. मातेचे दूध बालकाला पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी राहते. मुल मोठे व्हायला लागल्यावर जो आहार पाहिजे तो पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे मुलांची वाढ योग्यरित्या होत नाही. यामुळे भविष्यात या कुपोषित बालकांचे आरोग्य उत्तम रहात नाही. अशा लोकसंख्येची कार्यक्षमता देखील कमी राहते. भारतासरख्या विकसनशील देशात कुपोषणासारखी समस्या मोठया प्रमाणात दिसून येत आहे. या कुपोषण समस्येची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने अंगणवाडयांचे कार्य भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे ठरते.

दारिद्रयामुळे कुपोषणाची समस्या निर्माण होते. कुपोषणामुळे अनेक लहान बालके मृत्यूमुखी पडत आहेत. भारतात कुपोषित बालकांचे प्रमाण फार मोठे आहे. जगातील तीन कुपोषित बालकांपैकी एक कुपोषित बालक हे भारतात आढळते. या गंभीर समस्येची सोडवणूक करण्यासाठी व लहान बालकांना कुपोषणापासून दूर ठेवण्यासाठी केंद्र सरकारने अनेक योजना राबविल्या आहेत. यात प्रामुख्याने मध्यान्ह अन्न योजना आहे. १ जानेवारी २००५ मध्ये प्राथमिक शाळेत जाणा-या मुला मुलींना मध्यान्ह अन्न योजना सुरू केली आहे. देश पातळीवर जे विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येतात त्यामध्ये महाराष्ट्रातील कुपोषण निर्मुलन अभियान आहे. या अभियानाचा यशस्वी प्रयोग म्हणून पुणे पॅटर्न अशी पुणे जिल्हयाची नोंद केली गेली आहे. पुणे जिल्हयातील कुपोषण निर्मुलनाच्या कामकाजाच्या या यशाची नोंद जागतिक बँकेने त्यांच्या अहवालामध्ये केली आहे.

**कुपोषणाची व्याख्या**

१) डेव्हीड वर्नर - "पुरेसा आहार न घेतल्यामुळे किंवा न मिळाल्यामुळे जी अशक्तपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण असे म्हणतात.

२) जागतिक संघटना - "कुपोषण म्हणजे अयोग्य व अपू-या आहारामुळे होणारी पूर्ण शरीराची अवस्था होय".

निरोगी जिवनासाठी पोषक आहाराची आवश्यकता असते. आहाराचा आणि आरोग्याचा अगदी निकटचा संबध असतो. योग्य आहारावरच शरीराची जडणघडण अवलंबून असते. शरीराला आवश्यक काम करण्यासाठी लागणारी शक्ती आपण घेत असलेल्या आहारातल्या अन्नपदार्थापासून मिळत असते. शरीराची होत असलेली झीज भरून काढणे, शरीरांमध्ये रोगप्रतिकारकशक्ती निर्माण करणे ही प्रमुख कामे अन्नांमध्ये असलेली पोषक द्रव्य करीत असतात. साहजीकच दैनंदिन आहाारात पोषक घटकांची कमतरता असेल तर कुपोषणाची स्थिती निर्माण होते.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१. अंगणवाडीमधील मुलांच्या पालकांचा अभ्यास करणे.
२. औंध परिसरातील अंगणवाडी सेविकांचा अभ्यास करणे.
३. या योजनेअंतर्गत इतर विविध उपक्रम देखील राबविले जातात.

**संशोधन पद्धती**

औंध परिसरात १० अंगणवाडया असुन प्रत्येक अंगणवाडीतून ३ पालकांची व एक सेविकेची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली आहे. पालकांची निवड करताना स्तरित यादृश्चिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे.

**अंगणवाडी म्हणजे काय**

तीन ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणे. त्यांचे आरोग्य,आहार, कुपोषण या बाबींकडे लक्ष पुरविणे. त्यांच्या पालकांना मार्गदर्शन करणे, ग्रामीण भागातील महिलांना आहार व आरोग्य विषयक मार्गदर्श

**Please cite this Article as:** प्रा. डॉ. विकास ज. पवार ,"औंध (पुणे शहर) परिसरातील अंगणवाडयांचा अभ्यास" : **Indian Streams Research Journal (March ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.II/ March; 2012

न करणे असे कार्य ज्या माध्यमातून होत असते किंवा ज्या ठिकाणावरून होत असते त्यास अंगणवाडी असे म्हणतात.

अंगणवाडी उपक्रमा अंतर्गत पुढील उपक्रम राबविले जातात.

१. आरोग्य तपासणी - अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रीया, स्तनदा माता, किशोरी तसेच ६ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य विभागाकडून किमान दोनदा आरोग्य तपासणी केली जाते. आणि कुपोषित श्रेणी ३ व ४ मधील बालकांची दरमहीन्याला आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात येतो. केंद्र सरकारकडून प्रत्येक अंगणवाडीला मेडीकल किट पुरविण्यात येते.

२. लसीकरण - डांग्या खोकला, घटसर्प, क्षयरोग, पोलिओ, गोवर या रोगांपासून ६ वर्षाखालील बालकांचे रक्षण करण्यासाठी प्रतिबंधक लस देण्यात येते.

३. पूरक पोषण आहार - ६ महिने ते ६ वर्षाखालील बालके, गरोदर स्त्रीया, स्तनदा माता यांना ३०० कॅलरीज व १० ग्रॅम प्रथिने मिळतील असा पुरक पोषण आहार दिला जातो.

४. संदर्भ आरोग्य सेवा - आरोग्य तपासणी अंतर्गत निदान करण्यात आलेल्या गंभीर स्वरूपाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकांना पुढील औषधोपचारास्तव महानगरपालिकेच्या शासकीय रूग्णालयात पाठविण्यात येते.

५. आहार आरोग्य शिक्षण - १५ ते ४५ वयोगटातील स्त्रीयांना गृहभेट महिला मेळावे, सभा, स्पर्धा, सकस आहार सप्ताह, स्तनपान सप्ताह इत्यादी माध्यामातून आहार व आरोग्य विषयक माहिती दिली जाते.

औंध परिसरात एकूण १६ अंगणवाडया आहेत. त्यातील १० अंगणवाडया प्राथमिक माहिती संकलनासाठी निवडल्या आहेत. त्यातील विद्यार्थी पालकांची माहिती संकलित केली आहे. या परिसरातील अंगणवाड्यात २००२-०३ मध्ये ४३८ बालक विद्यार्थी होते. हेच प्रमाण २०१०-११ ला २५४० बालक विद्यार्थी इतके झाले आहे. या आठ वर्षाच्या कालावधीत बालक विद्यार्थ्यांची वाढ १७-२४ टक्के इतकी झालेली आढळते. प्राथमिक माहितीच्या आधारे विद्यार्थी पालकांमध्ये निरक्षर पालकांचे प्रमाण २४.० टक्के इतके होते. निरक्षर विद्यार्थी पालकांचे प्रमाण २४.२ टक्के इतके होते तर एस.एस.सी. पर्यंत शिक्षण असणा-या पालकांचे प्रमाण ५० टक्के होते. उच्च शिक्षण असणा-या पालकांचे प्रमाण फक्त १६ टक्के होते. प्रत्येक अंगणवाडीत एक सेविका असते यातील ४० टक्के सेविकांचे शिक्षण फक्त एस.एस.सी. पर्यंत झालेले होते. तर ६० टक्के सेविका उच्च शिक्षित असल्याचे दिसून आले.

औंध परिसरातील अंगणवाडया मार्फत इतर उपक्रम देखील राबविले जातात. प्रामुख्याने दत्तक पालक योजना, तरूण मंडळ व खाजगी संस्थांचा सहभाग, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, नाविन्यपूर्ण उपक्रम, आरोग्य तपासणी, पुरक पोषण आहार दर्जा वाढ असे उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांना परिसरातील दानशूर व्यक्ती, व्यापारी व्यावसायिक व काही कंपन्या देखील आर्थिक मदत करतात.

**निष्कर्ष**

१. अंगणवाडीत शिकणा-या मुलांच्या पालकांमध्ये ७६ टक्के पालक हे शिक्षीत आहेत तर २४ टक्के पालक निरक्षर आहेत. पालकांमध्ये निरक्षरता असल्यामुळे मुलांच्या पोषणावर त्याचा अनिष्ठ परिणाम होत आहे.

२. अंगणवाडति शिकणा-या मुलांच्या पालकांपैकी ६० टक्के पालकांनी मुलांची आरोग्य तपासणी वेळेवर व्हावी अशी सूचना केलेली आहे. याचा अर्थ अंगणवाडीत आरोग्य सुविधेकडे दुर्लक्ष होत आहे.

३. अंगणवाडीत शिकणा-या मुलांच्या पालकांचा धर्म सर्वाधिक बौध्द आहे. या धर्मातील पालकांचे प्रमाण ४० टक्के आहे. हिन्दु मराठा धर्मातील पालकांचे प्रमाण २० टक्के दिसून आले आहे.

४. अंगणवाडी सेविकांना मिळणारा पगार अल्प मिळतो. तो पगार देखील वेळेवर होत नाही. त्यामुळे या सेविकांकडून योग्य प्रकारचे काम केले जात नाही.